**ठळक बातम्या**

- राज्याचा आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प उद्या विधीमंडळात सादर होणार
- नागपूरच्या मिहान इथं उभारण्यात आलेल्या पतंजली फूड आणि हर्बल पार्कच्या कोनशिलेचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अनावरण
- पुढच्या दोन दिवसांत कोकणात उष्णतेची लाट येण्याचा हवामान विभागाचा अंदाज

**आणि**

- आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत भारत आणि न्यूझिलंडमध्ये अंतिम सामना सुरू, नाणेफेक जिंकून न्यूझिलंडचा प्रथम फलंदाजीचा निर्णय

**<><><><><><>**

राज्याचा आगामी आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प उद्या विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये सादर होणार आहे. महायुती सरकार पुन्हा सत्तेत आल्यानंतरचा हा पहिलाच अर्थसंकल्प अर्थमंत्री अजित पवार आधी विधानसभेत आणि त्यानंतर विधानपरिषदेत सादर करतील. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेची रक्कम वाढवण्यासह काही महत्त्वाच्या घोषणा या अर्थसंकल्पात होण्याची अपेक्षा आहे.

**<><><><><><>**

नागपूरच्या मिहान इथं उभारण्यात आलेल्या पतंजली फूड आणि हर्बल पार्कच्या कोनशिलेचं अनावरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय रस्ते आणि परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते आज झालं. हे आशियातलं प्रथम तर देशातलं सर्वात मोठं फूड पार्क आहे.

संत्र्याचं उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांकडून संत्री घेऊन त्यावर प्रोसेसिंग केलं जाणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं. या प्रकल्पाचा लाभ संत्री उत्पादन करणाऱ्या छोट्या शेतकऱ्यांना होणार असल्याचं ते म्हणाले.

छोटी संत्री बाजारात १२ ते १३ रुपयाला विकला जाते, मात्र पतंजली शेतकऱ्यांकडून १८ रुपये किलो या दरानं घेणार असल्याचं गडकरी यांनी सांगितलं. विदर्भात पिकवल्या जाणाऱ्या संत्र्यांची एका दिवशी जवळपास आठशे टन फळांवर अशाप्रकारे प्रक्रिया केली जाऊ शकते.

**<><><><><><>**

नवीन खाणपट्टे मंजुरी प्रक्रियेत 'गती शक्ती' प्लॅटफॉर्मचा प्रभावी वापर करुन राज्यातले खाणपट्टे कार्यान्वित करण्यासाठी लिलाव प्रक्रियेला गती देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातल्या प्रमुख खनिजांच्या ४० खाणपट्ट्यांबाबतची बैठक सह्याद्री अतिथीगृहात काल झाली. राज्य खनिकर्म महामंडळ व खनिकर्म विभाग, खनिकर्म विभागांतर्गत हाताळण्यात येणारे विषय, खनिजक्षेत्राची ई-लिलाव प्रक्रिया आदींबाबत सविस्तर आढावा बैठकीत घेण्यात आला.

**<><><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी मुंबईची आर्थिक स्थिती भाजपा पद्धतशीरपणे कमकुवत करत असल्याचा आरोप केला आहे. तसचं, गुजरातमध्ये गिफ्ट सिटीसारख्या सुविधा मुंबईला मिळाव्यात, अशी मागणीही ठाकरे यांनी केली. मुंबई इथं एका जाहीर कार्यक्रमात ते बोलत होते. मुंबईतला कोस्टल रोड, अटल सेतू आणि इतर पायाभूत सुविधा प्रकल्पांमधल्या विलंबावरही ठाकरे यांनी टीका केली. तसंच, मुंबई शहरातल्या आरोग्य सेवेवरही त्यांनी निराशा व्यक्त केली.

**<><><><><><>**

कामगार मंत्रालयानं तात्पुरत्या आणि ऑनलाइन पद्धतीने काम करणाऱ्या कामगारांना आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे लाभ मिळविण्यासाठी ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करण्याचं आवाहन केलं आहे. देशातील ३१ हजारांहून

अधिक सार्वजनिक आणि खाजगी रुग्णालयांमध्ये आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत प्रति कुटुंब ५ लाख रुपये द्वितीय आणि तृतीय स्तरावरच्या आरोग्य सेवांसाठी मिळू शकतात. २०२५-२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात यासंबंधी तरतूद करण्यात आली आहे. २०२४-२५ मध्ये एक कोटीहून अधिक कामगारांना रोजगार मिळण्याचा अंदाज असून २०२९-३० पर्यंत अशा कामगारांची संख्या २ कोटी ३५ लाखांपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे.

**<><><><><>**

नुकत्याच झालेल्या द्विपक्षीय व्यापार करारांतर्गत भारताने ऑस्ट्रेलिया, युएई, स्वित्झर्लंड आणि नॉर्वे सारख्या प्रमुख विकसित देशांसाठी सरासरी लागू केलेल्या व्यापार शुल्कात लक्षणीय घट केली आहे. यंदा फेब्रुवारीमध्ये, भारत आणि अमेरिका यांनी परस्पर फायदेशीर, बहु-क्षेत्रीय द्विपक्षीय व्यापार कराराच्या पहिल्या टप्प्यात वाटाघाटी करायला सहमती दर्शविली आहे.

**<><><><><>**

मुंबईत होऊ घातलेल्या वेव्हज् अर्थात वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिटच्या निमित्तानं ऍनिमेशन स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. भारतातील ऍनिमेशन क्षेत्राला चालना देण्यासह मांगा, वेबटून आणि ऍनिमेशन या शैलींमधल्या भारतीय प्रतिभेला जगासमोर आणणं हा या स्पर्धेचा उद्देश आहे. या क्षेत्रातले विद्यार्थी, तसंच नवे आणि अनुभवी व्यावसायिक तज्ञ, वैयक्तिक आणि संघिक स्वरुपात या स्पर्धेत भाग घेऊ शकतील. या स्पर्धेसाठी नोंदणीसह अधिक माहितीकरता आपण वेव्हज् इंडिया डॉट ओआरजी या संकेतस्थळाला भेट देऊ शकता.

**<><><><><>**

पुढच्या दोन दिवसांत कोकण, गोवा, सौराष्ट्र आणि कच्छमध्ये उष्णतेची लाट येण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने वर्तवली आहे. तर पश्चिम बंगालमध्ये

काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळाचा अंदाज वर्तवला आहे. जम्मू-काश्मीर, लडाख, गिलगिट बाल्टिस्तान, मुजफ्फराबाद आणि हिमाचल प्रदेशातही उद्या वादळाची शक्यता आहे. तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकलमध्येही अशीच परिस्थिती राहणार आहे.

<><><><><><>

चँपियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज भारत आणि न्यूझीलंड यांच्यात विजेतेपदासाठी सामना होणार आहे. न्यूझिलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा न्यूझिलंडच्या ७ षटकांत बिनबाद ४७ धावा झाल्या होत्या.

याआधी न्यूझिलंडविरुद्धच्या सामन्यात भारतानं ४४ धावांनी विजय मिळवला होता. मात्र न्यूझिंलडने इतर सर्व सामने जिंकले. या स्पर्धेत भारतीय संघाने आतापर्यंत एकही सामना गमावला नाही. गेल्यावर्षी टी ट्वेंटी विश्वचषक जिंकल्यामुळे भारतीय संघाचा आत्मविश्वास वाढला होता, असं भारतीय संघाचा उप कर्णधार शुभमन गिल सामन्याच्या आधी झालेल्या वार्ताहर परिषदेत म्हणाला.

<><><><><><>

महाराष्ट्रात ठाण्यामध्ये पूर्व द्रुतगती महामार्गावर कॅडबरी ब्रीजवर काल रात्री दीड वाजण्याच्या सुमारास तीन गाड्या एकमेकांवर आदळून झालेल्या अपघातात सहा जण जखमी झाले. मुलुंड चेक नाक्याकडून निघालेल्या रेतीच्या डंपर वर चालकाचं नियंत्रण सुटून तो ट्रक वर आदळला. त्या नंतर तो ट्रक एका गाडीवर आदळला. त्यात २ मुलांसह ४ प्रवासी प्रवास करत होते. या अपघातात अडकलेल्या २ प्रवाशांना अग्निशमन दलाच्या जवानांनी स्थानिकांच्या मदतीनं सुखरूप बाहेर काढलं. सर्व जखमींना ठाण्यातल्या रुग्णालयात दाखल केलं आहे. या अपघातामुळे घोडबंदरकडे जाणारी वाहतूक १ तास बंद होती.

<><><><><><>

भिवंडीतल्या काल्हेर परिसरात असलेल्या एका गोदामातून चोरट्यांनी  घुसून सुमारे ४२ लाख रुपयांची रोकड लंपास केली आहे. याप्रकरणी नारपोली पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

<><><><><><>

शासनाच्या ई-ऑफिस प्रणाली वापराच्या उपक्रमात अकोला जिल्हा परिषद अव्वल ठरली आहे. अकोला जिल्हा परिषदेने गेल्या ७ महिन्यांच्या कालावधीत ५१ हजार २३१ 'ई-ऑफिस फाइल्स' तयार केल्या आहेत. गेल्या ऑगस्टपासून अकोला जिल्हा परिषद प्रशासनामार्फत 'ई-ऑफिस' प्रणालीमध्ये कामकाज सुरू करण्यात आलं आहे.

<><><><><><>

नाटककार प्रशांत दळवी यांना यंदाचा आरती प्रभू पुरस्कार कवयित्री नीरजा यांच्या हस्ते काल प्रदान करण्यात आला. रोख २१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह, मानपत्र आणि शाल श्रीफळ असं या पुरस्काराचं स्वरूप आहे. सिंधुदु्र्ग जिल्ह्यातल्या कुडाळमधील बाबा वर्दम थिएटर्स आणि आरती प्रभू कला अकादमी संस्थेकडून हा पुरस्कार दिला जातो.

<><><><><><>

उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांना प्रकृती अस्वाथ्यामुळे काल रात्री उशिरा अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, एम्स मध्ये दाखल करण्यात आलं आहे. रात्री उशिरा त्यांच्या छातीत दुखून त्यांना अस्वस्थ वाटू लागलं. कार्डिओलॉजि विभागाचे प्रमुख डॉ. राजीव नारंग यांच्या देखरेखीखाली ते असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचं वृत्त आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी रुग्णालयात जाऊन धनखड यांची विचारपूस करून त्यांच्या सुदृढ आरोग्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.००वाजता
९ मार्च २०२५ रविवार

<><><><><><>

मणिपूरमध्ये भारतीय लष्कर आणि आसाम रायफल्सच्या जवानांनी काल संयुक्तपणे शोधमोहिम राबवून मोठ्या प्रमाणावर युद्धसामग्री जप्त केली. मणिपूरमध्ये जिरीबाम, तेंग्नोपाल, काकचिंग, उखरुल, इम्फाळ पूर्व आणि पश्चिमेच्या डोंगराळ तसंच सखल भागातल्या जिल्ह्यांमध्ये मणिपूर पोलीस, सीआरपीएफ, बीएसएफ आणि आयटीबीपीच्या सहकार्याने ही मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेत २५ शस्त्रं, आयईडी, ग्रेनेड, दारुगोळा आणि इतर युद्धसामग्री जप्त करण्यात आली. तसंच, कांगपोकपी जिल्ह्यातले बंकरही उद्धस्त करण्यात आले.

<><><><><><>

न्यूयॉर्क इथल्या संयुक्त राष्ट्रांच्या मुख्यालयात उद्यापासून सुरू होणाऱ्या कमिशन ऑन द स्टेटस ऑफ विमेनच्या ६९व्या सत्रात भारताचं प्रतिनिधीमंडळ सहभागी होणार आहे. केंद्रीय महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांच्याकडे या प्रतिनिधीमंडळाचं नेतृत्व असेल. या सत्रात अन्नपूर्णा देवी भारताचं म्हणणं मांडतील, तसंच या मंत्रीस्तरीय गोलमेज परिषदेतही भाग घेतील. याशिवाय महिला आणि मुलींच्या सक्षमीकरणाविषयीच्या इतर चर्चांमध्येही त्या सहभागी होणार असल्याची माहिती मंत्रालयानं दिली आहे.

//<><><><><><>//